**महाराष्ट्र शासन**

<u>सर्वप्राथम्य/तात्काळ</u>

**क्रमांक. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३६/ज-१अ**
महसूल व वन विभाग, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- २० जुन, २०१८.**

**प्रति,**

१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व विभागीय आयुक्त.
३) सर्व जिल्हाधिकारी

**विषय:-** महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम १९६८ च्या नियम २ चा पोट-नियम (२) मधील शासन राजपत्रात सुधारणा आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच स्थानिक दोन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषया संदर्भात, शासन राजपत्रात मंगळवार, दिनांक १२ जून,२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या मराठी आणि इंग्रजी भाषेतील नियमांच्या अधिसूचनेची प्रत या पत्रासोबत जोडण्यात आलेली आहे.

**०२.** सदर अधिसूचनेस **स्थानिक दोन वृत्तपत्रात** व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी, तसेच, या अधिसूचनेची प्रत **आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर** देखील प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

**( सुनिल कोठेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
१.सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग,

२.सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, (महसूल), महसूल व वन विभाग,

३.निवडनस्ती (ज-१अ)

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ७७] मंगळवार, जून १२, २०१८/ज्येष्ठ २२, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
पहिला मजला, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १२ जून २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३६/ज-१अ.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८, च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (त्रेसष्ठ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून "महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८" यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजले आहे, त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी त्याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा दिनांक १५ जुलै २०१८ किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**नियमांचा मसुदा**

१. या नियमांना, "महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) (सुधारणा) नियम, २०१८" असे म्हणावे.

२. "महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८" च्या नियम २ चा पोट-नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येतील.—

"(२).——वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकास कोणत्याहीवेळी लागवडीखाली आणता येईल, आणि अशाप्रकारे धारकाने जमीन लागवडीखाली आणल्यास, त्या प्रकरणी, लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात, पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे, त्याकरिता जिल्हाधिकारी अतिरिक्त आकारणी करतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 12th June 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No.Sankirn-2018/C.R.36/J-1A.—The following draft of rules, further to amend the Maharashtra Land Revenue (Restrictions on Use of Land) Rules, 1968, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (*Lxiii*) of sub-section (*2*) of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the date 15th July 2018.

2. Any objection or suggestion which may be received by the Additional Chief Secretary (Revenue), to the Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Restrictions on Use of Land) (Amendment) Rules, 2018.

2. The sub-rule *(2)* of rule 2 of the Maharashtra Land Revenue (Restrictions on Use of Land) Rules, 1968, shall be substituted, namely: –

"(2)***.- Land falling in class (a) may be brought under cultivation at any time by the holder and if such land is brought under cultivation by the holder, then an additional assessment*** proportionate to the area of such land brought under cultivation shall be levied by the Collector."
"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.